(A Govt. of Maharashtra Undertaking)
CIN:U40109MH2005SGC153645

**दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११**
**फॅक्स नं. :** २६४७५८१४
email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

**औद्योगिक संबंध विभाग,**
**प्लॉट जी-९, प्रकाशगड, ४था मजला**
**प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई - ४०० ०५१.**

**जा.क्र. : औसंवि/ब/कोव्हीड सहाय्य /११५४५** **दिनांक : १९.०६.२०२०**

# परिपत्रक

**विषय:-कोव्हीड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे दुर्देवाने मृत्यू झाल्यास सानुग्रह सहाय्य अदा करणेबाबत.**

**संदर्भ:- महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२० /प्र.क्र.४/व्यय -९ दि. २९/०५/२०.**

******

राज्यातील कोव्हीड-१९ (Covid-19) विषाणूच्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने सर्वेक्षण,शोध,माग काढणे,प्रतिबंध,चाचणी, उपचार व मदत कार्य करणे या करीता कर्तव्यरत असणा-या त्यांच्या अधिकारी / कर्मचा-यांना पाठबळ देण्याकरीता तसेच या अधिकारी / कर्मचा-यांचा कोव्हीड-१९ या विषाणूच्या संसर्गाने दुर्देवी मृत्यु झाल्यास त्यांच्या कुटूंबियांना रु.५० लक्ष इतक्या रकमेचे सर्वकष वैयक्तीक विमाकवच/ सानुग्रह सहाय्य देण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने संदर्भिय शासन निर्णयान्वये घेतलेला आहे.

२. तत्कालीन म.रा.वि.म.मंडळाच्या विभाजनानंतर अस्तित्वात आलेल्या तीन कंपन्या आणि म.रा.वि.म.सुत्रधारी कंपनी मर्यादीत या कंपन्या हया राज्यामध्ये अखंडीत वीज पुरवठा करण्याचे कार्य करीत असुन त्या अत्यावश्यक सेवा (Essential Services) पुरविणा-या आस्थापनांमध्ये मोडतात. या कंपन्याचे अधिकारी /कर्मचारी देखील प्रस्तुतच्या कोव्हीड-१९ रोगाच्या साथीच्या काळामध्ये अखंडीतपणे सेवा बजावित आहेत. या सेवा बजावित असतांना त्यांना देखील कोव्हीड-१९ या विषाणूचा संसर्ग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कंपनीच्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या करीता सानुग्रह सहाय्य देण्याचा विचार मागील काही काळ प्रशासनाच्या विचाराधीन होता. त्याचप्रमाणे कंपनीत विविध कंत्राटदार संस्थेमार्फत बाहयस्त्रोताद्वारे कार्यरत असणारे कंत्राटी कामगार तसेच सुरक्षारक्षक यांना देखील मानवतेच्या दृष्टीकोनातून सानुग्रह सहाय्य देण्याची बाब प्रशासनाच्या विचाराधीन होती.

३. याबाबत मा.व्यवस्थापकीय संचालक म.रा.वि.म.सुत्रधारी कंपनी मर्यादीत यांनी महावितरण, महानिर्मिती व महापारेषण या तिन्ही कंपन्यांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचेशी विचारविनिमय करुन कंपनीच्या अधिकारी/ कर्मचारी यांच्याकरीता खालीलप्रमाणे सानुग्रह सहाय्य लागू करण्यास मंजूरी दिलेली आहे.

**(अ) कंपनीचे नियमित अधिकारी आणि कर्मचारी सानुग्रह सहाय्य -**

(१) म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादीत, व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत (महावितरण कंपनी) मध्ये कार्यरत सर्व तांत्रिक तसेच अतांत्रिक संवर्गामध्ये कार्यरत सर्व अधिकारी/कर्मचारी,(तसेच सर्व प्रशिक्षणार्थी / सहाय्यक कर्मचारी) यांना ही योजना लागू असेल. अशा अधिकारी /कर्मचारी यांना कर्तव्य बजावित असतांना कोव्हीड-१९ या विषाणूचा संसर्ग झाल्यास व त्यामध्ये त्यांचा दुर्देवी मृत्यु झाल्यास त्यांच्या कुटूंबियांना/ वारसांना रु.३० लक्ष (रु. तीस लक्ष मात्र ) इतक्या रकमेचे सानुग्रह सहाय्य खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून महावितरण कंपनीकडुन अदा करण्यात येईल.

(अ) सदरचा अधिकारी/ कर्मचारी,इस्पितळात दाखल होण्याच्या अथवा मृत्यूच्या दिनांकापूर्वी १४ दिवसांच्या काळामध्ये कर्तव्यावर हजर असला पाहिजे. सदरील उपस्थितीची बाब ही सदर मृत अधिकारी/कर्मचा-याचा नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांचेकडुन प्रमाणित केली जाणे आवश्यक आहे.

(ब) सदर मृत्यू हा कोव्हीड-१९ विषाणूशी संबंधित असल्याचे वैद्यकीय प्रमाणन हे शासकीय /पालिका/महानगरपालिका /आय.सी.एम.आर. नोंदणीकृत खाजगी इस्पितळ/प्रयोगशाळा यांचेकडुन प्राप्त अहवालाच्या आधारे करण्यात आलेले असावे.

(क) कोव्हीड-१९ च्या संसर्गामुळे झालेल्या मृत्यूनंतर सानुग्रह सहाय्य देण्यासंदर्भात मृत अधिकारी/कर्मचा-याच्या वारसांमध्येकाही वितुष्ट अथवा त्याबाबत मतभेद असल्यास सानुग्रह सहाय्य रक्कम ही वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) घेऊनच अदा करण्यात येईल.

(ड) खाजगी इस्पितळ/प्रयोगशाळेमार्फत सादर करण्यात आलेल्या प्रमाणपत्रांवर शासकीय अधिका-यांची (Medical Officer/D.H.O./Civil Surgeon) प्रतिस्वाक्षरी (Countersign) केलेली असणे आवश्यक आहे.

(इ) उपरोक्त प्रमाणे विमाकवच/ सानुग्रह सहाय्य रक्कम अदा करण्याकरीता कामावरील उपस्थितीबाबत अटी व शर्ती या महाराष्ट्र शासन निर्णयानुसार राहतील.

(ई) या संदर्भात उदभवणा-या दाव्यांबाबत निर्णय घेण्याचे सर्वाधिकार हे कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना असतील व त्यांचा निर्णय अंतिम तसेच बंधनकारक राहील.

(२) सदर सानुग्रह सहाय्य योग्य त्या कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर मंजुर करण्याचे अधिकार क्षेत्रीय कार्यालयाकरीता परिमंडळाचे मुख्य अभियंता व सांघिक कार्यालयाचे स्तरावर संबंधित विभाग प्रमुख यांना देण्यात आलेले आहेत.

(३) अ.क्र.१ (अ) ते (ई) यामध्ये नमुद केलेले सानुग्रह सहाय्य खालील प्रकारात मोडणा-या अधिकारी/कर्मचा-यांना अनुज्ञेय राहणार नाही.

(अ) जे अधिकारी/ कर्मचारी दिर्घ रजा, कामावर गैरहजर, धारणाधिकार (Lien) रजा ,शैक्षणिक रजा, बाल संगोपन रजा (Child Care Leave) आणि प्रतिनियुक्तीवर आहेत.

(ब) जे कर्मचारी निलंबित झालेले आहेत.

(क) ज्या अधिकारी /कर्मचा-यांनी कर्तव्य बजाविण्यासाठी कामाची ठिकाणी उपस्थित न राहता ज्यांनी घरुन काम (Work from Home) केलेले आहे.

**(ब) कंपनीत बाहयस्त्रोताद्वारे कंत्राटदार संस्थेमार्फत कार्यरत कंत्राटी कामगारांना आणि सुरक्षारक्षकांसाठी सानुग्रह सहाय्य-**

(१) कंपनीत विविध कंत्राटदार संस्थेमार्फत बाहयस्त्रोताद्वारे घेण्यात आलेले कंत्राटी कामगार त्याचप्रमाणे सुरक्षारक्षक यांना सानुग्रह सहाय्य खालील नमुद अटी व शर्तीवर लागू करण्यास मंजूरी दिली आहे.

(अ) महावितरण कंपनीमध्ये बाहयस्त्रोताद्वारे ठेकेदार संस्थेमार्फत कार्यरत कंत्राटी कामगार तसेच विविध सुरक्षारक्षक एजन्सीज मार्फत कार्यरत असलेले सुरक्षारक्षक यांना देखील सानुग्रह सहाय्य लागू असेल. त्याअंतर्गत कंपनीचे कर्तव्य बजावित असतांना कोव्हीड-१९ या विषाणूचा संसर्ग झाल्यास व त्यामध्ये त्यांचा दुर्देवी मृत्यू झाल्यास संबंधित ठेकेदार संस्थेमार्फत त्यांच्या कुटूंबियांना /वारसांना रुपये ३० लक्ष (रु.तीस लक्ष मात्र) इतक्या रकमेचे सानुग्रह सहाय्य देण्यात येईल व सदर रकमेची प्रतिपुर्ती कंपनीमार्फत संबंधित ठेकेदार संस्थेस करण्यात येईल.

(ब) उपरोक्त सानुग्रह सहाय्य रकमेसंदर्भातील कंत्राटी कामगार आणि सुरक्षारक्षकांबाबत भविष्यात कोणतीही कायदेशिर अडचण निर्माण होऊ नये, याकरीता सानुग्रह सहाय्य मंजूर करतांना ठेकेदार संस्थेस रु. ३० लक्ष प्रतिपुर्तीच्या पत्रामध्ये संबंधित कार्यालयाने खालील बाबीचा प्रामुख्याने समावेश करावा.

*An amount of Rs. 30 Lakhs is being paid to you for your Contractual employee, who has died due to Corona Virus (Covid-19) while you have engaged him for doing duty with us, as an ex-gratia payment, in view of unprecedented nature of this pandemic and a slew of measures taken out by the Government for such class of workers, and on purely humanitarian grounds and shall not be used as basis for seeking any permanency/employment by his heirs.*

(क) वरील अटी व शर्ती व्यतिरिक्त परिच्छेद क्र.३ (अ) च्या (१) खालील (अ) ते (ई) मधील अटी या कंत्राटी कामगार आणि सुरक्षारक्षकांना यथास्थिती लागू राहतील. मात्र जे कंत्राटी कामगार,सुरक्षारक्षक दिर्घ रजेवर,कामावर गैरहजर आहेत तसेच ज्यांनी कामाच्या ठिकाणी उपस्थित न राहता घरी राहून काम (Work from Home) केले आहे असे कंत्राटी कामगार,सुरक्षारक्षक सानुग्रह सहाय्यासाठी पात्र राहणार नाहीत.

(२) कंत्राटी कामगार तसेच सुरक्षारक्षकाचा कोव्हीड-१९ विषाणूचा संसर्ग झाल्यामुळे मृत्यू झाल्यास त्याच्या कुटूंबियांना सानुग्रह सहाय्य रक्कम अदा करतांना उपरोक्त अटी व शर्तींना अधिन राहुन संबंधित मयत कंत्राटी कामगाराची तसेच सुरक्षारक्षकाची नियुक्ती करणा-या कंत्राटदार संस्थेने सर्व कागदपत्रांची पडताळणी त्यांच्या स्तरावर करावी. त्याबाबत संबंधित कंत्राटदाराला संस्थेला कामाचे आदेश देणा-या संबंधित कार्यालयप्रमुख यांच्याकडुन मान्यता घ्यावी व तदनंतर मयत कंत्राटी कामगार अथवा सुरक्षारक्षक यांचे वारसास रु.३० लक्ष (रु.तीस लक्ष मात्र) रक्कम अदा करावी. संबंधित कंत्राटदार संस्थेने मयत कंत्राटी कामगाराचे वारसास सानुग्रह सहाय्याची रक्कम अदा केल्याची योग्य ती कागदपत्रे सादर केल्यानंतर संबंधित कार्यालय प्रमुख यांनी प्रकरणपरत्वे संबंधित मुख्य अभियंता /विभाग प्रमुख यांची पूर्वमान्यता घेऊन सदर रकमेची प्रतिपुर्ती संबंधित कंत्राटदार संस्थेस करावी. सदर रुपये ३० लक्ष (रु.तीस लक्ष मात्र) सानुग्रह सहाय्या व्यतिरिक्त कोव्हीड-१९ च्या उपचाराकरीता झालेल्या रुग्णालयातील खर्चाची कोणतीही रक्कम कंपनीमार्फत अदा करण्यात येणार नाही.

४. वर नमुद केलेप्रमाणे रुपये ३० लक्ष (अक्षरी रु.तीस लक्ष मात्र) रकमेचे सानुग्रह सहाय्य हे महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त आदेशात नमुद केल्यानुसार दि. २८ मार्च २०२० ते दि. ३० सप्टेंबर २०२० पर्यत लागू राहील अथवा सदर आदेशास शासनाने मुदतवाढ दिल्यास त्या तारखेपर्यत लागू राहील.

५. सानुग्रह सहाय्य्य अदा करण्यात आल्यानंतर त्याचा प्रकरण निहाय सविस्तर अहवाल औद्योगिक संबंध विभाग,मुख्य कार्यालय,मुंबई यांचेकडे सादर करावा.

सदर परिपत्रक हे कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(संजय रा. ढोके)**
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**